Historicity Research Journal
Volume 2 | Issue 5 | Jan 2016

Impact Factor : 0.4521(UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# ‘रामनगरी’ मधील समाजजीवन

राजेंद्र सा. बावळे
महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी.

**सारांश :**

शब्द हे साहित्याचे माध्यम आहे. साहित्याच्या विविध प्रकारांतून समाजजीवनाचे चित्रण होते. साहित्यकृती ही प्रतिभेची निर्मिती असते. साहित्य हे समाजाच्या सर्जनशीलतेचे एक सुंदर रूप आहे, शक्तीरूप आहे व समाजाचे श्रध्दास्थानही आहे. कलावंताच्या निर्मितीच्या प्ररणेपेक्षा त्याच्या आविष्कार करण्याच्या पध्दतीशी सामाजिकतेचा घटक अधिक निगडित असतो. साहित्य हा समाजाचा आरसा असतो, असेही म्हटले जाते. साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे. समाज या संकल्पनेचा संदर्भात विचार करताना केवळ मानव प्राणीच ‘सामाजिक’ आहे, असे आपल्याला म्हणता जीवितरक्षणासाठी परस्परसंबंधाची व्यवस्था या अर्थाने मुंग्या, मधमाशा यांसारख्या कीटकांमध्येही समाजव्यवस्था असते. माणूसदेखील समाजात राहणारा सामाजिक प्राणी आहे. मानवाने संस्कृतीची निर्मिती केली, पण समाजाशिवाय संस्कृती अशक्य आहे. सामाजिक संबंध अर्थपूर्ण करण्यासाठी समाजाच्या विविध श्रध्दा, अंधश्रध्दा, मूल्ये, रूढी, प्रथा व परंपरा यांतून परस्पर व्यवहाराच्या विशिष्ट पध्दती निर्माण होतात.

**प्रस्तावना:**

प्रा. डॉ. भास्कर शेळके म्हणतात, ‘‘मानवी जीवनात साहित्य आणि कलेला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. मानवी मन, भावना, विचार यांच्या आविष्कारातून साहित्यनिर्मिती होते. मानवी मनाची धारणा, विचारांचे स्वरूप, संवेदनात्मकतेची जाणीव या जितक्या सामाजिक बाबी आहेत, तितक्याच त्या व्यक्तिगतही आहेत. मानवाने आपल्या प्रतिमेच्या जोरावर साहित्य निर्माण केले.’’[१]

‘रामनगरी’ मधून राम नगरकर आपल्यासमोर लेखक म्हणून येत असले, तरी मुळात ते एक अभिनेता, कलावंत आहेत. रंगमंच ही त्यांची कर्मभूमी आहे. नगरकर हिंदू समाजात एका विशिष्ट जातीत, म्हणजे न्हावी जातीत, जन्माला आले. त्यामुळे समाजाची उपेक्षा त्यांना सहन करावी लागली. डॉ. रवींद्र कडू म्हणतात, ‘‘समाजातील चालीरीती, रूढी, श्रध्दा- अंधश्रध्दा इ. चे वर्णन रामनगरीतून करतात, तर आज विज्ञानयुगात माणूस आपली जात विसरायला तयार नाही’[२]

नगरकरांचा जन्म सारोल्यात झाला. व्यवसायानिमित्त त्यांचा पुणे, मुंबई ह्या शहरांशी संबंध आला. प्रत्येक ठिकाणी त्यांना समाजाकडून जातीयतेचे चटके सोसावे लागले. पुण्याला टिळक रोडवर नगरकरांनी एअर कंडिशन्ड असे ‘वंदन केशकर्तनालय’ नव्याने सुरू केले. जवळच राहण्यासाठी जागा शोधताना त्यांना जात आडवी येते. त्यांना सदाशिवपेठेत हा अनुभव येतो. सोसायटीत घरासाठी ब्लॉक घेतला. तेथे सहकुटुंब राहायला आले. सोसायटीतील रहिवाशांकडून आलेले अनुभव जाचक आहेत. नगरकरांचा जसा सांस्कृतिकदृष्टया विकास झाला होता, तसा पत्नी राधा हिचा झाला नव्हता. ब्लॉकमध्ये कसे राहावे, शिष्टांच्या समाजात कसे राहावे इ. विषयी हे कुटुंब अनभिज्ञ व असंस्कृत असेच होते. सकाळ-संध्याकाळ मिरसी लावून सोसायटीतील परिसरात पचकन थुंकणे, रस्त्यावरून येणा-या - जाण-या फेरीवाल्यांकडून घणेरडे खाद्यपदार्थ घेऊन खाणे, नऊवारीचे पायघोळ

लुगडे व कपाळी मळवटी कुंकू लावून मिरविणे, उठता- बसता 'आय-माय' वरून शिव्या देणे, असे मागासलेपण सोसायटीत प्रदर्शित झाल्यावर सोसायटी नगरकरांकडे तिरस्काराने पाहू लागली आणि दुरावा ठेवून वागू लागली. 'कनवटीला चार पैसे आले की, ही मंडळी कोणाच्याही मांडीला मांडी लावून बसायला लागतात', असे कुत्सित उद्गार नगरकरांना ऐकायला मिळतात.

बालपण ग्रामीण भागात गेल्याने 'रामनगरी' मध्ये ग्रामीण परिसरातील देवदेवतांच्या रूढी, प्रथा, परंपरा म्हणजे दरवर्षी होणा-या यात्रा-जत्रा दिसतात. त्यातून संपूर्ण समाज एकत्रित येऊन सण-उत्सवांमध्ये सहभागी होताना दिसतो. नगरकरांच्या विवाहामध्ये, प्रथा, परंपरा यांनुसार चालत आलेले रीतीरिवाज दिसून येतात. नगरकरांच्या विवाहाला त्यांना चूच करावी लागते. ( चूच म्हणजे ज्यांचे लग्न असते, त्याला हळद लागण्यापूर्वी डोक्यावर, म्हणजे जे कपाळ आहे त्याचा, दोन्ही कान धरून प्रथम कार्याने शंकराच्या पिंडीचा आकार करायचा. मग तेवढाच भाग वस्ता-याने काढायचा. बाकी केसाला एक नंबर मशीन मारून सर्व सारखा करणे. याला काही ठिकाणी 'चेहरा' म्हणतात.) तसेच विवाहापूर्वी परसाकडला जाणे आणि झुडुपाआड खोटेखोटे संडासाला बसल्यासारखे करणे ही एक आगळीवेगळी प्रथ दिसून येते. अशा अनेक प्रथा 'रामनगरी' या आत्मचरित्रात आलेल्या दिसतात. लग्नातल्या रीतीरिवाजांतून नवरा-नवरींना भुताखेताचे भय राहत नाही. कारण त्यांचे अंग हळदीचे असते. लागीर होण्याची भीती असते. म्हणून समाजाच्या संकेतानुसार विशिष्ट जाती-जमातीच्या प्रथा, परंपरा व रीतीरिवाज हा पाळावा लागतो.

गावामध्ये एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्याला वाजतगाजत स्मशानापर्यंत नेले जाते. प्रेतासमोर न्हावी वेगवेगळी वाद्ये-वाजंत्री वाजवत असत. कुटुंबातल्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर एका महिन्यात झाला पाहिजे, अन्यथा तीन वर्षे विवाह करता येत नाही हा समाजाने घालून दिलेला संकेत दिसतो. मुंबईच्या सोसायटीत मोलकरीणसुद्धा त्यांच्या, म्हणजे नगरकरांच्या, घरचे अन्नपदार्थ खत नाही. याचे कारण सांगताना ती म्हणते, ''न्हाव्याच्या घरी भांडी घासते, तर माझी सगळी जात माइ-या नावानं बोटं मोडते. आता मला जेवू घालून माणसातनं उठवता व्हय?

डॉ. सुनंदा देशपांडे म्हणतात, '''रामनगरी' या आत्मचरित्रातून नगरकरांनी देव, नियती, योगायोग, आशीर्वाद, शुभाशुभ इ. गोष्टींवरचा विश्वास व्यक्त केला आहे. दैवतावर, रूढी, प्रथा व परंपरेवर श्रद्धा आणि जीवनाकडे पारंपारिक चाकोरीतून पाहतात.''[३]

नगरकरांच्या विवाहानंतर पत्नीला सुधारण्याचा, आधुनिक पद्धतीने राहणे, वागणे, बोलणे, चालणे इ. चे संस्कार करण्याचा प्रयत्न नगरकर करतात. पत्नी पारंपारिक धारणेची होती. पतीपत्नीने रस्त्याने चालताना अंतर ठेवून चालावे, हातात हात घालून चालू नये,सिनेमा पाहू नये अशी त्यांची धारणा होती. नगरकर मात्र पत्नीच्या या मताच्या विरूद्ध होते. त्यामुळे पत्नीच्या राहणे, वागणे, बोलणे, पोशाख इ. मध्ये परंपरेचीच धारणा दिसून येते.

'रामनगरी' या आत्मचरित्रातून अंधश्रद्धा, अंधविश्वास इ.चे अधूनमधून दर्शन होते. रमाचा जन्म ज्या क्षणी होतो, त्याच क्षणी गावात मोठी आग लागते. तसे रामचे वडील घर सोडून पळून जातात. वडिलांच्या पलायनाचा दोष रामच्या माथी मारला जातो. रामचा पायगुण वाईट मानण्यात येतो. रामनगरीतील अंधविश्वास व अंधश्रद्धेची सुरुवात अशी होते. दुसरा अत्यंत करुण प्रसंग रामची बहीण द्रौपदीला दुष्काळी कामावर उन्हातान्हात काम करताना टॉयफाईड होतो, पण ही भूतबाधा आहे, या समजुतीमधून भगताकडून अघोरी उपचार केले जातात. 'मला बांगडया भरा' असे तापात बरळते. भगताकडून झालेल्या मारहाणीत तिचा करुण, हृदयद्रावक मृत्यू होतो. हा अंधश्रद्धेने घेतलेला निर्घृन बळी आहे. आपल्या गाण्या-बजावण्याच्या वेडापायी एकदा राम त्यांच्या कौसल्या बहिणीला पेटी (हार्मोनियम) वाजवून दाखवितात. लगेच तिच्या अंगात येते व ती घुमू लागते. नगरकर मुंबईच्या सोसायटीत राहायला गेल्यावर तिथे आजारी पडतात, तेव्हा हा ब्लॉक आपल्याला धार्जिण नाही, अशी घरातील बहुतकांची समजूत होते. ती जागा सोडून नगरकर इतरत्र राहायला जातात.

लेखकाचे सासू-सासरे योची मुले जगत नसतात, होतात पण काही काळात ती पटापट मरून जात. तेव्हा षंकरराव कदम (सासरा) म्हणतात, ''च्यायला! आपल्या मागं काय पनवती लागली?'' या विचाराने तो तळमळून जाई, ज्यांने देवदेव केले, समाजाने जे सांगितले ते ते केले. कुणी सांगितले, पाच मंगळवार धरा, अमक्या दंवाचा अंगारा लावा, मरीआईला दंडवत घला, गणपतीला पुजा, दोघांनी मिळून नवस करा. पोरीला (राधेला) नवरा बघा. षंकररावांनी राधेचा विवाह राम नगरकरांषी लावला. अषा अनेक प्रसंगातून अंधश्रद्धा दिसून येते. त्यानुसार माणूस आपल्या जीवनात समाजाचे अनुकरण करीत असतो.

राम नगरकरांच्या 'रामनगरी' मध्ये अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील सारोळा या खेडेगावची पार्श्वभूमी दिसून येते. गावामध्ये वेगवेगळया जाती-धर्माच्या श्रद्धा, संस्कृती, प्रथा, परंपरा, रीतीरिवाज दिसून येतात. लेखकाने प्रामुख्याने न्हावी जातीतल्या लोकांचे जीवन, चालीरीती, रूढी, परंपरा इ. वर प्रकाश टाकलेला दिसून येतो. समाजाने घालून दिलेले संकेत हे परंपरेनुसार चालत आलेले आहेत. ते संपूर्ण जाती, धर्मातील लोक पाळताना दिसून येतात. तसेच पंचक्रोशील नातेवाईकांचा व्यवसाय, धंदा, चित्रपट, लोकनाटक यांच्या निमित्ताने पुणे, मुंबई शहरांशी संबंध येतो. शहरात ही प्रथा परंपरा, रीतीरिवाज त्याची पाठ सोडत नाही. अशा विविध ठिकाणाचे अनुभव लेखकाने 'रामनगरी' तून व्यक्त केलेले आहेत.

संदर्भ :
१) साळवे शशिकांत (प्रस्तावना) अंतर्भूत :शेळके भास्कर, 'सशोधन स्वरूप आणि पद्धती' शब्दश्री प्रकाशन ,जुन्नर , प्रथमावृत्ती : २०१२, पृ. ३
२) कडू रवींद्र ( लेख), 'मराठी सिनेअभिनेत्योची आत्मचरित्रे : एक आकलन ' , अंतर्भूत : 'अक्षयसमीक्षा ' , (त्रैमासिक) , ऑक्टो . -नोव्हें. - डिसें दृ २०१२, पृ.६५
३) कुलकर्णी सुनंदा, ' अभिनेत्या कलावंतांची आत्मचरित्रे ' , ऋचा प्रकाशन , नागपूर , प्रथमावृत्ती : १९९७ ,पृ. २